अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृहाकरिता दैनंदीन कपडे धुलाईच्या कामाकरिता स्थानिक लॉन्ड्रीं व्यवसाय धारकांकडून कोटेशन मागविण्यात येत आहे. त्याकरिता दि.१८/ ६/ २०१८ ते दि.२२/ ६/ २०१८ पर्यंत दुपारी १:०० वाजेपर्यंत कोटेशन कै.बा.दे.दवाखाना येथे स्विकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचा प्रकार | कपड्याचा प्रकार | दर | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथील रुग्णांचे वापरातले ऑपरेशन थिएटर मधील व तत्सम दैनदीन वापरातले कपडे धुलाई करुन मिळणे. | लहान कपडे | | २ वर्षे |
| | | मध्यम कपडे | | |
| | | मोठे कपडे | | |

<u>अटी व शर्ती :-</u>

१) लॉन्ड्री व्यावसाय संबंधी शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेचे परवानगीची आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक तसेच शॉप ॲक्ट व तत्सम कागदपत्रे.

२) संस्थेचे आयकर अथवा जी.एस.टी. रिटर्न संबंधीचे कागदपत्रे व पॅनकार्डची झेरॉक्स देणे आवश्यक.

३) महानगरपालिकेच्या कै.बा.दे.दवाखान्यातील वरील वर्णनाचे कपडे दवाखान्यातून घेऊन जाणे, धुवुन इस्तरी करुन पोहच करुणे आवश्यक आहे.

४) **लहान कपडे म्हणजे :-** इन्स्ट्रुमेंट बॅग, स्पंजेस, उशी कव्हर, डॉक्टर टॉवेल, पोट पट्टे, **मध्यम कपडे म्हणजे :-** सिंपल, पेरिनियल शीट , परकर, ब्लाऊज, खिडकी पडदे, **मोठे कपडे म्हणजे :-** दाराचे पडदे, ऑपरेशन गाऊन, बेडशिट, ब्लॅकेंट , सोलापुरी ऑप. चादरी असे असतील.

५) **दवाखान्याची सेवा ही अत्यावश्यक असल्याने कपडे धुलाईची सुविधेमध्ये दिरंगाई अथवा खंडीतता आढळुन आलेस प्रती दिन रू.**१०००/- दंड आकारण्यात येईल.

६) धुण्यास नेलेल्या गहाळ कपड्यांची पुर्ण भरपाई संबंधीत संस्थेस द्यावी लागेल..

७) धुतलेले कपडे अस्वच्छ आढळुन आल्यास त्याबाबत फेर धुलाईसाठी वेगळा मोबदला मिळणार नाही.

८) कपडे धुण्यासाठी कुठल्याही प्रकारची साधन सामुग्री, साबन, सोडा व इतर वस्तूंची संबंधीत संस्थेस व्यवस्था करावी लागेल.

९) दरमहा धतलेल्या कपड्यांचा हिशोब बिलासह दरमहिन्याच्या ५ तारखेपर्यंत कै.बा.दे.दवाखाना येथे सादर करण्यात यावे. बील मनपा अकौंट विभागामार्फत उपलब्ध निधी प्रमाणे व उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार अदा करणेत येईल.

१०) कायदेशीर कार्यवाही अहमदनगर विभागातील न्यायालयाचे कक्षेत राहील.

११) काम वेळेवर करावे लागेल. काम वेळेवर व व्यवस्थित न झालेस कुठलीही पुर्व सुचना न देता सेवा बंद करण्यात येईल याबाबत मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांचा निर्णय अंतीम राहील.

१२) वरील प्रमाणे १ ते ११ अटी शर्ती मान्य असले बाबत रूपये शंभर फक्तच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

प्र.वैद्यकीय अधिक्षक
कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह
अहमदनगर महानगरपालिका